पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला,चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in



जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/५९५९८००/२०२६ पिंपरी चिंचवड दिनांक - २०/११/२०२६

वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दि.२१/११/२०२६ रोजी मा. व्ही.व्ही.आय.पी पुणे येथून सुस ब्रिज मार्गे सिम्बायोसिस कॉलेज, लवळे येथे जाणार आहेत. सदरची मुव्हमेंट ही सुस ब्रिज मार्गे सिम्बॉयसेस कॉलेज, लवळे अशी होणार होणार आहे.सुस ब्रिज ते सिम्बायोसिस कॉलेज या दरम्यानच्या मार्गवर रस्तादुभाजक नसल्याने मा.व्हि.व्हि.आय.पी यांचे मार्गामध्ये कोणतेही वाहन येवुन धोका निर्माण होवुनये यासाठी नमुद मार्गावर वाहतुकीस प्रवेशबंदी करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विक्रांत देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतीलते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करीत आहे.

बावधन वाहतुक विभाग

- सुस ब्रिज कडुन सिम्बायोसिस कॉलेज लवळे व सिम्बॉयसिस कॉलेज ते सुस ब्रिज जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग-१. सुसब्रिज -ननावरे अंडरपास - बिटवाईस कंपनी-डावीकडे सर्विस रोडने राधा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग-२.सुसब्रिज -चांदणीचौक - भुगाव - पिरंगुट कडुन उजवीकडे वळुण -घोटावडे फाटा– गोडांबेवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग- ३ चांदे नांदेकडून येणारी वाहने नांदे येथुन डावीकडे वळुन - व्हि.टी.पी सर्कल– हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

वरील प्रमाणे दिनांक २१/११/२०२६ रोजीमा. व्ही. व्ही. आय. पी दौऱ्याचे अनुषंगाने सकाळी ०८/०० ते दुपारी १४/००वाजे दरम्यान **तात्पुरते स्वरुपात** सर्व प्रकारच्या वाहनांस आवश्यकतेनुसार प्रवेश बंदीकरण्यात येत असून अधिसुचना(नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी वाहतूक कोंडी व गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(विक्रांत देशमुख)
पोलीस उपायुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड.

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त साो,पिंपरी चिंचवड शहर
२) मा अपर पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड
३) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
४) मा. पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर
५) प्रभारी अधिकारी **बावधन** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड
- वाहतुक बदलाचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींग करुन वाहतुक वळविलेचे माहीती फलक बसवावे.